पालघर आवृत्ती

संपादक : संदीप ज्ञानोबा बोडके

साप्ताहिक

RNI NO. MHMAR/26/A1491 www.samajsatta.com

# समाज सत्ता

www.samajsatta.com

Mo. : 9049940157

वर्षे १ ले | अंक ११ | पालघर, सोमवार, दि. १५ जून ते २१ जून २०२६ | मुल्य : २ रु | पान ४

# स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ

**राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुंबई, दि. १४ : स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.

**जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना**

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने ७ लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

**रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना**

रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

**आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी**

आरोग्य क्षेत्रात बँकेच्या 'सीईंग इज बिलिव्हिंग' या प्रमुख उपक्रमांतर्गत ४ लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे.

स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# 'एल निनो'च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**पालघर :** यंदाच्या खरीप हंगामावर 'एल निनो'चा प्रभाव पडण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तविण्यात आली आहे. यामुळे संपूर्ण राज्यात आणि कोकण किनारपट्टीच्या भागात कमी किंवा असमान पावसाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. या पार्श्वभूमीवर, पालघर जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी केवळ मान्सूनपूर्व किंवा सुरुवातीच्या वादळी पावसाच्या आधारे खरीप पिकांची (मुख्यतः भात, नागली आणि वरई) पेरणी किंवा धूळवाफ पेरणी करण्याची घाई करू नये, असे महत्त्वपूर्ण आवाहन पालघर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी निलेश भागेश्वर यांनी केले आहे.

हवामानातील वाढती अनिश्चितता लक्षात घेता शेतकऱ्यांनी स्थानिक हवामानाचा अंदाज, पावसाची स्थिती आणि मातीतील ओलावा यांचा विचार करूनच पेरणीचा निर्णय घ्यावा. घाईघाईने पेरणी केल्यास दुबार पेरणीची वेळ येऊ शकते आणि त्यामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांनी आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कृषी विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करूनच पेरणीचे नियोजन करावे. प्रादेशिक हवामान केंद्र आणि कृषी विद्यापीठाने जारी केलेल्या हवामान सल्ल्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. एल निनो काळात हवामानाची अनिश्चितता लक्षात घेता एकाच पिकावर अवलंबून न राहता आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा, बियाण्यांची उगवणक्षमता टिकवून ठेवण्यासाठी बीजप्रक्रिया आवर्जून करावी व कमी कालावधीत येणाऱ्या आणि अवर्षणाचा प्रतिकार करणाऱ्या वाणांची निवड करावी. एल-निनोच्या पार्श्वभूमीवर सावधगिरी बाळगून केलेले नियोजन हेच यंदाच्या खरीप हंगामातील यशाचे मुख्य सूत्र ठरणार आहे.

# जागतिक रक्तदाता दिनानिमित्त पालघर येथे रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन

**पालघर :** जागतिक रक्तदाता दिनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, यांच्या वतीने पालघर रेल्वे स्थानक येथे रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर आणि सर्वजीवन सेवा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

या प्रसंगी खासदार डॉ. हेमंत सवरा , कॅप्टन सत्यम ठाकूर यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांना व स्वयंसेवकांना प्रोत्साहन दिले.

शिबिरास रक्तदाते, स्वयंसेवक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजातील विविध घटकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत रक्तदानाच्या या पवित्र कार्यात योगदान दिले. शिबिरादरम्यान एकूण ३६ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले असून, या रक्तसंकलनामुळे गरजू रुग्णांना जीवनदान देण्यास निश्चितच मदत होणार आहे.

यावेळी हरीदया फाऊंडेशन च्या प्रतिनिधींनी अवयवदानाबाबत जनजागृती करून नागरिकांना अवयवदानाचे महत्त्व पटवून दिले . रक्तदानाबरोबरच अवयवदानासारख्या जीवनदायी कार्यांविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला, तसेच पर्यावरण स्वरक्षणासाठी सीडबॉल चे वाटप देखील केले.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, पालघर यांच्या वतीने सर्व रक्तदाते, मान्यवर पाहुणे, स्वयंसेवक, सहकार्य करणाऱ्या संस्था तसेच या उपक्रमास सहकार्य करणाऱ्या सर्व व्यक्तींचे आभार व्यक्त करण्यात आले. समाजहितासाठी अशा प्रकारचे उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे वैद्यकीय अधिकारी तथा मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष पालघर अध्यक्ष डॉ. कृपेश बाबरेकर यांनी सांगितले.

# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवारांची राष्ट्रवादी सैनिक सेलच्या शिष्टमंडळाशी विविध मागण्या संदर्भात भेट

**उपमुख्यमंत्री व प्रदेशाध्यक्ष दिपकराजे शिर्के यांच्यात सकारात्मक चर्चा**

**मुंबई :** मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांची महाराणी येसुबाईंच्या माहेरकडील राजेशिर्के घराण्याचे वंशज तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष दिपकराजे शिर्के यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने भेट घेत विविध सामाजिक, राजकीय व माजी सैनिकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली.



दि. १६ जून २०२६ रोजी झालेल्या या बैठकीत राष्ट्रवादी माजी सैनिक सेलच्या वतीने विविध मागण्यांचे लेखी निवेदन उपमुख्यमंत्री सुनेत्राताईंना सादर करण्यात आले. तसेच चर्चे दरम्यान पक्ष संघटन बांधणी, राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडी, शेतकरी कर्जमाफी, सामाजिक व ऐतिहासिक विषयावर तसेच आजी-माजी सैनिक, पोलीस व संरक्षण क्षेत्राशी संबंधित माजी कर्मचाऱ्यांच्या विविध अडचणी, समस्या व प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. बैठकी दरम्यान महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेत माजी सैनिकांना अधिक प्राधान्य देणे, त्यांच्यासाठी अतिरिक्त पदांना मंजुरी देणे तसेच सैनिक कल्याणाशी संबंधित विविध मागण्यांवर विशेष भर देण्यात आला. सैनिकांच्या समस्या शासन स्तरावर प्रभावीपणे सोडविण्याची मागणी शिष्टमंडळाने केली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी राज्यातील कष्टकरी शेतकरी, माजी सैनिक आणि देशसेवेसाठी योगदान देणाऱ्या सर्व घटकांच्या सन्मान व हक्कांसाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले. सैनिकांच्या विविध प्रश्नांबाबत नक्कीच सकारात्मक भूमिका घेऊन आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासनही उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवारांनी दिले. यासंगी राजेशिर्के घराण्याचे वंशज राष्ट्रवादी माजी सैनिक सेलचे प्रदेशाध्यक्ष शंभुसेना प्रमुख दिपकराजे शिर्के, प्रदेश उपाध्यक्ष श्रीमंत राठोड, प्रदेश संपर्क प्रमुख चंद्रकांत गायकवाड, माजी सैनिक चंद्रकांत ढेंबरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी सैनिक आणि मान्यवर उपस्थित होते.

# खताचा काळाबाजार आणि साठेबाजीवर कृषी विभागाची मोठी कारवाई ; ११३ परवान्यांवर कारवाई, ७ गुन्हे दाखल

**पुणे :** शेतकऱ्यांना दर्जेदार आणि रास्त दरात खतांचा पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभागामार्फत पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये खत विक्री केंद्रांची कडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. एप्रिल २०२६ पर्यंत विभागात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत १०७ खत विक्री परवाने निलंबित आणि ६ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत, तर ७ केंद्रांवर गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी दिली आहे. या मोहिमेअंतर्गत पुणे विभागात एकूण २ हजार ५७६ परवानाधारक केंद्रांची तपासणी करण्यात आली.

## संपादकीय

# पुन्हा शेतकऱ्यांची चिंता वाढली !

७ जून रोजी दर वर्षाप्रमाणे मान्सूनचे आगमन या होईल, या आशेवर शेतकरी असतो. परंतु प्रत्येक वर्षी मान्सूनचा दगा फटका हा चालूच असतो. यंदा केरळमध्ये मान्सून आला, तर कोपऱ्यातही त्याने । हजेरी लावली. बाकी इतर ठिकाणच्या जिल्ह्यांमध्ये १५ जून पर्यंत मान्सूनचे आगमन होईल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. परंतु वारे फिरले. १५ जून ऐवजी मान्सून २० जून पर्यंत येईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर कोकणातही मान्सून पहिले बरसला, त्यानंतर त्याचा जोर कमी झाला. तेथूनही तो गायब झाला. आता कुठे त्याने पुन्हा हजेरी लावली आहे. मुंबईला नुसते ढग येतात. पस्तीस अंश डिग्री सेल्सिअसच्या तापमानात मुंबईकर उकडून निघत आहेत. असह्य उकाडा मुंबईकर सहन करत आहेत. बाकी इतर जिल्ह्यात त्यातल्या त्यात जळगाव जिल्ह्यात पावसाने चांगलीच पाठ फिरवली आहे. काही शेतकऱ्यांनी धूळ कपाशीची पेरणी केली आहे. पावसाचा भरवसा काय ? आज येईल. उद्या येईल.. असे ढगाकडे पाहून शेतकरी पावसाची वाट पाहतो आहे. परंतु यंदा पावसाचे ढग सुद्धा नाहीत. नुसतेच वारगट वाहते आहे. तेव्हा कशाकडे पाहन आपली आशा व्यक्त करतो तेच कळत नाही. धूळपेरणी व्यतिरिक्त ज्याच्याकडे विहिरीचे पाणी आहे, त्या पाण्यावर कपाशीची लागवड केली आहे. पण विहिरीचे पाणी पुरत नसल्याने त्यांना सुद्धा पावसाची प्रतीक्षा करावी लागते आहे. एकंदरीत शेतकरी मान्सूनची चातकासारखी वाट पाहतो आहे. पण पाऊस फुलकावणी देत आहे. ढगही येत नाहीत. त्यामुळे इथून तिथून पार आशा मावळली आहे. पाऊस पडला पडत नाही तोपर्यंत शेतकरी आनंदी होणार नाही. २२ जूनला पाऊस पडला नाही तर शेतकऱ्यासमोर फार मोठ्या अडचणी निर्माण होतील यात शंका नाही. त्यात धूळपेरणीची खते वाया जातील. पुन्हा बियाण्यासाठी आणि खतासाठी शेतकऱ्यांना नवीन खर्च करावा लागतो. नवीन बियाणे व खतासाठी कर्ज घेणे आले. कर्जाच्या या दुष्चक्रात शेतकरी तर दरवर्षी अडकतच राहतो. त्याला इलाज नाही. जर २२ जूनला पाऊस आला तर धूळपेरणी केलेले पीक हाती येण्याची दाट शक्यता आहे. आणि पाण्यावर ज्यांनी कपाशीची पेरणी केली आहे त्यांची कपाशी चांगली येण्याची शक्यता आहे. त्यानंतर शेतकरी इतर खरीप पिकांची पेरणीची वाट पाहत आहे. खरिपाची ज्वारी, तूर, मका, मूग, उडीद, बाजरी ही पिके पेरणीसाठी त्याला पाऊस चांगला हवा आहे. काय होते हे पाहायचे आहे. दरवर्षी शेतकऱ्यांच्या नशिबी पावसाची वाट पाहणे हे आलेच. पाऊस वेळेवर आला तर चांगले, वेळेवर नाही आला तर त्याच्या पिकाचे उत्पादन घटते. त्याचे उत्पन्न कमी येते. परंतु पेरणी झाली त्यातही पावसाने दडी मारली की पिकांची वाढ खुंटते आणि त्याच्या उत्पन्नावर परिणाम होतो. त्यात पावसाची दडी फार मोठी असली की पिके वाळून जळून जातात. म्हणजे खरिपाची पेरणी वाया जाते. मग खरीपाच्या ठिकाणी रब्बीची पेरणी करणे आले. हे दुष्चक्र शेतकऱ्यांच्या नशिबी चालूच राहते. मग शासनाकडे मदतीची याचना वगैरे आली. मग एकरी इतकी इतकी मदत द्या, असा आग्रह चालू असतो.

पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या भारतात सर्वात जास्त आहे. पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत हे दुष्चक्र चालूच राहणार यात शंका नाही. त्यासाठी शेतीचे सिंचन क्षेत्र वाढवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. एक तर मोठ्या प्रमाणात शेतीचे सिंचन क्षेत्र हे धरणाच्या पाण्यावर अवलंबून आहे. त्यात महाराष्ट्रात धरणांची संख्या फार कमी आहे. जे शेतकरी सिंचनासाठी धरणे केली आहेत, उदाहरणार्थ हातनूर धरण शेतकऱ्यांसाठी केले आहे. पण याचा जास्तीत जास्त उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी केला जातो. त्यामुळे हातनुर धरण, गिरणा धरण, वाघुर धरण यांचा उपयोग सिंचनापेक्षा जास्त पिण्याच्या पाण्यासाठीच होतो. जर पाऊस जास्त झाला तर पिकाच्या पाण्याचा प्रश्न मिटतो आणि त्यावेळी या धरणातील पाण्याची सिंचनासाठी उपयोग केला जातो. पण पिण्याच्या पाण्याला प्राधान्य दिल्यामुळे बहुतेक धरणातील पाणी पिण्यासाठीच वापरले जाते हेही तितकेच खरे आहे. बाकी धरणे निम्न तापी धरण हे प्रलंबित आहे. तीस वर्षे झाली अद्याप त्याचे काम चालूच आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांना खास शेतीचे सिंचन उपलब्ध व्हायला हवे. ते झाले तरच शेतकरी सुजलाम सुफलाम होऊ शकतो. आता तर नार पार गिरणा नदी जोड प्रकल्प हा महत्त्वाचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्याला जर पूर्णता मिळाली तर अर्ध्या जळगाव जिल्ह्याला त्याचे पाणी मिळेल. सिंचन आणि पिण्याचे पाणी दोन्हींसाठी त्याचा उपयोग होणार आहे. परंतु या योजनेला अजून मूर्त स्वरूप आलेले नाही. ते होईल तेव्हा होईल. मात्र ते केव्हा होईल हे देखील सांगता येत नाही. तोपर्यंत शेतकऱ्यांना पावसावरच अवलंबून राहावे लागणार आहे.. !

# पालघर जिल्ह्यातील आरोग्य सेवांना मोठी चालना

- **जायका सहाय्यांतर्गत नांदोर येथे ५०० खाटांचे वैद्यकीय महाविद्यालय मंजूर; जे. जे. रुग्णालय, मुंबई यांच्या सहकार्याने हेल्थ युनिट पालघरमध्ये क्लिनिकल सेवांचा विस्तार; स्वतंत्र ऑपरेशन थिएटर व व्यापक क्षेत्रीय आरोग्य मोहिमेची आखणी विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत**



**पालघर :** ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांसाठी आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने पालघर जिल्हा प्रशासनाने 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनाशी सुसंगत अशा अनेक महत्त्वपूर्ण आरोग्यविषयक उपक्रमांची घोषणा केली आहे. या उपक्रमांमुळे तृतीय, दुय्यम आणि प्राथमिक आरोग्यसेवा अधिक सक्षम होण्यासोबत वैद्यकीय शिक्षण, तज्ज्ञ सेवा, संशोधन आणि समुदाय आरोग्य सेवांनाही मोठी चालना मिळणार आहे.

### नांदोर येथे ५०० खाटांचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

पालघर जिल्ह्यातील नांदोर येथे जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सी यांच्या आर्थिक सहाय्याने ५०० खाटांचे तृतीयस्तरीय रुग्णालय असलेले नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाचा प्रस्ताव नुकताच हाय पॉवर कमिटी समोर सादर करण्यात आला असून, बांधकाम सुरू होण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

हे महाविद्यालय सुरू झाल्यानंतर पालघर तसेच शेजारील जिल्ह्यांतील नागरिकांना अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध होणार असून उत्तर कोकण विभागातील वैद्यकीय शिक्षण आणि प्रशिक्षणाचे हे एक प्रमुख केंद्र ठरणार आहे.

### हेल्थ युनिटमधील क्लिनिकल सेवांचा विस्तार

ग्रँट गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज आणि सर जे. जे. समूह रुग्णालय, मुंबई यांच्याशी संलग्न असलेल्या हेल्थ युनिट पालघर (ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र) येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सहकार्याने ग्रामीण रुग्णालय, पालघरमार्फत क्लिनिकल सेवांचा विस्तार करण्यात येत आहे.

सर जे. जे. रुग्णालयाच्या तांत्रिक आणि वैद्यकीय मार्गदर्शनाखाली येथे दैनंदिन आरोग्य सेवा पुरवल्या जाणार असून त्यामध्ये आपत्कालीन प्रसूती व नवजात शिशू सेवा, नियोजित व आपत्कालीन शस्त्रक्रिया तसेच बालरुग्णांसाठी अंतर्गत उपचार सेवा यांचा समावेश असेल. यामुळे ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये दर्जेदार आरोग्य सेवा अधिक जवळ पोहोचणार आहेत.

सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी जिल्हा रेसिडेन्सी कार्यक्रमांतर्गत पदव्युत्तर निवासी डॉक्टरांची नियुक्ती केली जात असून शस्त्रक्रिया, स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र, बालरोग आणि भूलतज्ज्ञ विभागांमध्ये पूर्णवेळ वरिष्ठ निवासी डॉक्टरही नियुक्त केले जाणार आहेत.

### स्वतंत्र शस्त्रक्रिया ऑपरेशन थिएटरचा प्रस्ताव

हेल्थ युनिट पालघर येथे सर जे. जे. रुग्णालय, मुंबई यांच्या सहकार्याने शस्त्रक्रिया आणि अस्थिरोग रुग्णांसाठी स्वतंत्र ऑपरेशन थिएटर उभारण्याचा प्रस्ताव आहे.

या सुविधेमध्ये मोतीबिंदू आणि इतर नेत्रशस्त्रक्रिया, हर्निया, हायड्रोसील, लिपोमा व सिस्ट काढण्याच्या शस्त्रक्रिया तसेच निवडक अस्थिरोग शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. सर जे. जे. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक नियमित भेटी देऊन हेल्थ युनिटमधील निवासी डॉक्टर आणि परिचारिका यांच्या समन्वयाने या शस्त्रक्रिया पार पाडणार आहे.

### व्यापक समुदाय आरोग्य जनजागृती आणि सेवा मोहीम

जिल्हाभर व्यापक क्षेत्रीय आरोग्य सेवा मोहीम राबविण्यात येत असून प्रतिबंधात्मक आणि समुदाय आधारित आरोग्य सेवांवर विशेष भर दिला जात आहे.

### मुख्य उपक्रमांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे :

- **अंगणवाडीतील बालकांसाठी आरोग्य तपासणी, रक्तक्षय निदान आणि वाढ मापन**
- **गर्भवती व प्रसूतीनंतरच्या मातांसाठी आरोग्य सेवा तसेच उच्च-जोखमीच्या गर्भधारणेची ओळख आणि व्यवस्थापन**
- **आदिवासी भागांमध्ये सिकल सेल रोगासाठी व्यापक तपासणी मोहीम**
- **शालेय विद्यार्थी आणि आश्रमशाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिरे**

या सर्व उपक्रमांची अंमलबजावणी हेल्थ युनिट पालघर आणि जिल्हा आरोग्य विभागाच्या संयुक्त सहकार्याने केली जाणार आहे.

### विकसित महाराष्ट्र २०४७ साठी आरोग्य आराखडा

पालघर जिल्ह्याने 'विकसित महाराष्ट्र २०४७' अंतर्गत आरोग्य क्षेत्रासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात आर्थिक वर्ष २०२६-२७ ते २०२९-३० पर्यंतचे टप्प्याटप्प्याने उद्दिष्टे, मोजता येण्याजोगे कार्यप्रदर्शन निर्देशांक आणि विविध निधी स्रोतांचा समावेश असलेली वित्तीय रणनीती नमूद करण्यात आली आहे. यामध्ये DPDC, राज्य शासन निधी, गखउ- सहाय्य, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहायता निधी पालघर आणि उडठ भागीदारी यांचा समावेश आहे.

### समतोल आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवेसाठी कटिबद्धता

हे सर्व उपक्रम एकत्रितपणे पालघर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेतील गेल्या काही वर्षांतील सर्वात व्यापक सुधारणांपैकी एक मानले जात आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागांतील प्रत्येक नागरिकाला सुलभ, दर्जेदार आणि समतोल आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या राज्य शासनाच्या वचनबद्धतेची ही पुनःप्रचिती असून 'विकसित महाराष्ट्र २०४७'च्या व्यापक उद्दिष्टांना देखील यामुळे बळकटी मिळणार आहे.

जारीकर्ता : हेल्थ युनिट पालघर (ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र), ग्रँट गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज आणि सर जे. जे. समूह रुग्णालय, मुंबई - पालघर जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पग्रस्तांसाठी २२ जून रोजी सकाळी ११ वाजता विशेष कॅम्प; न्यायिक, अर्धन्यायिक व महसुली प्रकरणांचा जागेवर निपटारा

- **जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष उपक्रम; ७५ टक्के शेतकऱ्यांचे प्रतिज्ञापत्र सादर, जवळपास एक हजार कोटी रुपयांचे वाटप**

**पुणे :** प्रस्तावित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पुरंदर) प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या महसुली, न्यायिक आणि अर्धन्यायिक स्वरूपाच्या प्रलंबित अडचणी सोडविण्यासाठी २२ जून रोजी सकाळी ११ वाजता सासवड प्रांत कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे.

या कॅम्पमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जागेवरच निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांनी प्रतिज्ञापत्रे (ॲफिडेव्हिट) सादर केली असून जवळपास एक हजार कोटी रुपयांच्या मोबदल्याचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांपर्यंत मोबदल्याची रक्कम तातडीने पोहोचावी, यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी सांगितले की, अनेक प्रकरणांमध्ये वारस नोंदी, फेरफार मंजुरी, सातबारा उताऱ्यातील त्रुटी, नाव दुरुस्ती, हक्कसोडपत्र, संयुक्त मालकीचे प्रश्न, मयत खातेदारांच्या नोंदी, मालकी हक्क पडताळणी, मूल्यांकनावरील हरकती, न्यायालयीन दावे तसेच विविध अर्धन्यायिक प्रकरणांमुळे मोबदला वितरणात अडथळे निर्माण होत आहेत.

या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी महसूल, भूमी अभिलेख, प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी कॅम्पमध्ये उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध कार्यालयांचे फेरे मारण्याची आवश्यकता राहणार नाही. अनेक शेतकऱ्यांच्या अडचणी या महसुली किंवा कागदोपत्री स्वरूपाच्या आहेत. त्या वेळेत दूर झाल्यास मोबदला वितरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण होऊ शकते. मात्र प्रकरणे न्यायालयात गेल्यास संबंधित रक्कम दीर्घकाळ प्रलंबित राहण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी प्रशासनासमोर मांडून विशेष कॅम्पचा लाभ घ्यावा, असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, न्यायिक आणि अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये अनेक स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. परिणामी अशा प्रकरणांचा अंतिम निपटारा होईपर्यंत संबंधित लाभार्थ्यांना मोबदला मिळण्यास विलंब होऊ शकतो. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना वेळेत लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने हा विशेष उपक्रम राबविला आहे. या विशेष कॅम्पमध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी स्वतः उपस्थित राहून प्रकरणांचा आढावा घेणार असून आवश्यक त्या प्रकरणांमध्ये तातडीने निर्णय घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देणार आहेत. प्रकल्पग्रस्तांनी सातबारा उतारा, आठ-अ, आधार कार्ड, पॅन कार्ड, वारस नोंदी, हक्कसोडपत्र, फेरफार अर्ज, न्यायालयीन कागदपत्रे तसेच इतर आवश्यक दस्तऐवजांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

"printed by Weekly SAMAJ SATTA and published by RAJESH SUKALAL DHIVAR on behalf of RAJESH SUKALAL DHIVAR and printed at M/S. SHREE SAMARTH PRINTERS, APPA BALWANT CHOWK, NEAR PRABHAT THEATRE, 535, SHANIWAR PETH, PUNE – 411030 (MS) and published at H NO 3 1ST FLOOR DREAMS IND PARK S N 199 POMAN ROAD KOLHI, TAL VASAI, PALGHAR, MAHARASHTRA - 401208 (Ms) Editor RAJESH SUKALAL DHIVAR "
Mob.: 9049940157 E-Mail- samajsatta@gmail.com, RNI NO. MHMAR/26/A1491
मराठी साप्ताहिक समाज सत्ता के मुद्रक : राजेश सुकलाल धिवर तथा प्रकाशक : राजेश सुकलाल धिवर द्वारा के पक्ष में श्री समर्थ प्रिंटर्स, आप्पा बळवंत चौक, प्रभात थिएटर के पास, ५३५, शनिवार पेठ, पुणे ४११०३० महाराष्ट्र से मुद्रित तथा एच नं ३ पहली मंजिल ड्रीम्स इंड पार्क एस एन १९९ पोमन रोड कोल्ही, ताल वसई, पालघर, महाराष्ट्र - ४०१२०८ महाराष्ट्र से प्रकाशित, संपादक राजेश सुकलाल धिवर
मोबा.: ९०४९९४०१५७ E-Mail- samajsattagmail.com, RNI NO. MHMAR/26/A149

समाजसत्ता
■ वर्षे १ ले ■ अंक ११ ■ पालघर, सोमवार, दि. १५ जून ते २१ जून २०२६


# आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ३० कोटींच्या अत्याधुनिक शैक्षणिक संकुलाचे लोकार्पण

आजचे विद्यार्थीच देशाचे भवितव्य - अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे

**पालघर :** शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत, नव्या शैक्षणिक वर्षाची आनंददायी सुरुवात आणि ३० कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक शैक्षणिक संकुलाचे लोकार्पण अशा दुहेरी आनंदाच्या वातावरणात डहाणू तालुक्यातील सूत्रकार येथील शासकीय आश्रम शाळेत सोमवारी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना, आजचे विद्यार्थी हेच देशाचे भवितव्य असून त्यांचे स्वागत आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन केले.




कार्यक्रमास आमदार विनोद निकोले, जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, डहाणू प्रकल्प अधिकारी विशाल खत्री, सहाय्यक प्रकल्प अधिकारी बन्सीलाल पाटील, शिक्षक, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना विकास खारगे म्हणाले की, पूर्वीच्या काळात विद्यार्थ्यांचे अशा पद्धतीने स्वागत होत नव्हते. मात्र आता शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून शासन, शिक्षक, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन एकत्रितपणे विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके, वह्या आणि शालेय साहित्य उपलब्ध झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

सूत्रकार येथील नव्याने उभारलेल्या शाळा इमारतीसह मुला-मुलींसाठीच्या स्वतंत्र वसतिगृहांचे कौतुक करताना त्यांनी सांगितले की, आदिवासी विद्यार्थ्यांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने शासनाचे हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे. इमारतींच्या उभारणीनंतर त्यांच्या देखभालीकडेही विशेष लक्ष देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागांना दिल्या.

आदिवासी मुलींना प्रेरणा देताना त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांचे उदाहरण दिले. मुली डॉक्टर, आयएएस अधिकारी, शास्त्रज्ञ, अभियंता किंवा पोलीस अधिकारी होऊ शकतात. त्यासाठी शिक्षणाची साथ आणि पालकांचा पाठिंबा आवश्यक आहे, असे ते म्हणाले. पालकांनी मुला-मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी महसूल विभागाच्या विविध योजनांची आणि जमीन हक्कांबाबतच्या कायद्यांची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचावी यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष पुस्तकाची माहिती दिली. सातबारा, वारसा हक्क आणि जमीन मालकीसंबंधीचे अधिकार नागरिकांना सहज समजावेत, यासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. मुलांच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा हा प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शासनाच्या विविध योजनांमुळे आदिवासी भागातील शिक्षणाला नवी दिशा मिळत आहे .

यावेळी अपर मुख्य सचिव विकास खरगे यांनी ग्रामपंचायत गंजाड येथे वनपाट्टे धारकासाठी ई केवायसी शिबीर व जि. प. शाळा कोटबी-बुजडपाडा येथे भेट दिली.

## पुणे कोकण विभागातील नमुना घटकांचे होणार सर्वेक्षण

- **पुणे येथे विभागीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न**

**पालघर :** शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालय (नियोजन विभाग) यांच्याद्वारे प्रथमच 'नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण' व 'असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण' एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत करण्यात येत आहे. या सर्वेक्षणाच्या क्षेत्रीय कामासाठी नियुक्त केलेल्या अन्वेषक व पर्यवेक्षकांची पुणे व कोकण विभागीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेचे उद्घाटन राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे (पुणे) येथे अर्थ व सांख्यिकीच्या आयुक्त डॉ. ज्योत्स्ना पडियार यांच्या हस्ते झाले.

यावेळी एनएसओ, एफओडी पुण्याच्या सहसंचालक डॉ. रुही कुलकर्णी, कोकण प्रादेशिक कार्यालयाचे सहआयुक्त जयसिंग म्हेत्रे, मुख्य कार्यालय मुंबईचे सहआयुक्त भीष्म बिरादार, पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाचे सहआयुक्त (नियोजन) संजय मरकळे, पुणे प्रादेशिक कार्यालयाच्या प्र. सहआयुक्त वृषाली मानकर, पुणे जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, पुणे जिल्हा सांख्यिकी कार्यालयाच्या उप आयुक्त प्रियांका बोकील आणि सेवानिवृत्त अतिरिक्त महासंचालक अशोक कुमार टोपराणी आदी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी आयुक्त डॉ. पडियार म्हणाल्या, विकसित भारत २०४७ नुसार जिल्हा हे विकासाचे मध्यवर्ती केंद्र आहे. त्याकरिता जिल्हास्तरीय रोजगार-बेरोजगार आकडेवारी, असंघटित क्षेत्रातील उद्योगांची संख्या तसेच रोजगार निर्मिती इत्यादी निर्देशकांची सविस्तर सांख्यिकी माहिती आवश्यक आहे. या दोन्ही सर्वेक्षणाद्वारे निर्माण होणारी माहिती राज्य व जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करण्यास आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना व धोरणे निश्चित करण्यास अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दूरदृष्य प्रणाली द्वारे मार्गदर्शन करताना सांगितले की, या सर्वेक्षणातून प्राप्त होणारी आकडेवारी ग्रामपातळी, जिल्हा आणि विभाग स्तरावरील धोरण निर्मितीसाठी पाया ठरणार आहे. त्यामुळे सर्व प्रगणकांनी आकडेवारी गोळा करताना योग्य ती दक्षता घ्यावी, तसेच नागरिकांनी अचूक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## पालघर जिल्ह्यात असंघटीत क्षेत्र आणि श्रमशक्ती सर्वेक्षण जनजागृती अभियानाचा शुभारंभ

**पालघर :** भारत सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयामार्फत घेण्यात येणाऱ्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण व असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण या महत्वपूर्ण राष्ट्रीय सर्वेक्षणांच्या जनजागृती अभियानाचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ.इंदू राणी जाखड़ यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हाधिकारी डॉ.इंदू राणी जाखड़ यांच्या हस्ते PLFS व ASUSE या सर्वेक्षणाच्या जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या माहितीपत्रके, पोस्टर्स व प्रचार साहित्याचे अनावरण करण्यात आले.

यावेळी प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी राजू ढोकणे व सांख्यिकी अधिकारी (अ.का) भगवान पवार, व कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी डॉ.इंदू राणी जाखड़ यांनी सांगितले की, PLFS (Periodic Labour Force Survey) या सर्वेक्षणाव्दारे कुटुंबातील सदस्यांची रोजगार स्थिती, बेरोजगारी, कामाचे स्वरुप, कामाचे तास, श्रमशक्ती सहभाग दर तसेच शिक्षण व वयोगटानुसार रोजगाराची स्थिती याबाबतची माहिती संकलित केली जाणार आहे. तसेच ASUSE (Annual Survey of Unincorporated Sector Enterprises) या सर्वेक्षणाव्दारे असंघटित क्षेत्रातील सूक्ष्म, लघु उद्योग, व्यापार, उत्पादन व विविध सेवा क्षेत्रातील आस्थापनांची माहिती संकलित करण्यात येणार आहे. या आकडेवारीच्या आाधारे असंघटित क्षेत्रातील उद्योगांची स्थिती, रोजगारनिर्मिती, उत्पादन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेतील योगदान यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. जिल्हा, राज्य आणि देशाच्या विकासासाठी अचूक व विश्वासार्ह सांख्यिकीय माहिती अत्यंत आवश्यक आहे. रोजगार, बेरोजगारी, स्वयंरोजगार तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी PLFS व ASUSE ही सर्वेक्षणे महत्वाची भूमिका बजावतात. या सर्वेक्षणातून प्राप्त होणारी माहिती विकास कामांचे नियोजन, रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास आणि विविध लोककल्याणकारी योजनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त ठरणार आहे. सदर सर्वेक्षणाकरीता शासनाने नियूक्त केलेले अधिकृत अन्वेक्षक निवडक कुटुंबे व आस्थापनांना भेट देऊन माहिती संकलित करणार आहे. सर्वेक्षणाव्दारे प्राप्त होणारी माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून तिचा वापर केवळ शासकीय सांख्यिकीय उद्देशासाठीच केला जाणार आहे. आपली माहिती - विकास नियोजनाचा पाया या संदेशासह जिल्ह्यातील सर्व नागरिक, उद्योजक, व्यावसायिक आणि असंघटीत क्षेत्रातील घटकांनी सर्वेक्षणात सक्रिय सहभाग नोंदवून सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड यांनी केले.

## ग्रीनफील्ड महामार्ग (वाढवण बंदर) प्रकल्पांतर्गत सर्व्हिस रोडच्या कामाची चांगली सुरुवात

**पालघर :** पालघर जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाला जोडणाऱ्या ग्रीनफील्ड महामार्गाच्या सर्व्हिस रोडचे काम समाधानकारक आणि पद्धतशीरपणे पुढे सरकत असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. राष्ट्रीय महत्त्वाचा असलेला हा बंदर प्रकल्प सर्व कायदेशीर प्रक्रियांचे पालन करून, पारदर्शकता राखून आणि योग्य ती खबरदारी घेऊन नियोजित व समन्वित पद्धतीने राबविला जात आहे. पालघरमध्ये सर्व्हिस रोडचे काम सुरू झाले असून, खारफुटी (मँग्रोव्हज) संदर्भातील आवश्यक आदेश प्राप्त होताच डहाणूमध्येही अशाच प्रकारे कामाला सुरुवात केली जाईल.

ग्रीनफील्ड महामार्गासाठी जमिनीचे संपादन राष्ट्रीय महामार्ग कायदा, १९५६ मधील तरतुदींनुसार आणि प्रकल्पासाठी नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकरणांमार्फत केले जात आहे.

या संपादन प्रक्रियेत डहाणू आणि पालघर तालुक्यातील एकूण २४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. संपादनासाठी प्रस्तावित एकूण जमिनीचे क्षेत्रफळ ६०४.७४ हेक्टर इतके आहे. आतापर्यंत सुमारे २८६ हेक्टर जमिनीचा



ताबा यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला आहे. यामध्ये डहाणूमध्ये १५७ हेक्टर आणि पालघरमध्ये १२८ हेक्टर जमिनीचे संपादन झाले असून, एकूण संपादन २८६ हेक्टरपर्यंत पोहोचले आहे. उर्वरित संपादन प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाईल आणि त्यादरम्यान सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता योग्य खबरदारी घेऊन केली जाईल.

नोटिसा बजावणे, सुनावणी, पडताळणी, नुकसानभरपाईचे मूल्यांकन आणि जमिनीचा ताबा यांसारख्या प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर प्रशासनाने कायद्याच्या योग्य प्रक्रियेचे पालन केले आहे, याची जिल्हा प्रशासनाने सुनिश्चिती केली आहे. तसेच, सर्व संबंधित घटकांचे (स्टेकहोल्डर्स) हित जपण्यासाठी नुकसानभरपाईचे वाटप आणि न्यायालयात रक्कम जमा करण्याची प्रक्रियाही कार्यक्षमतेने पार पाडण्यात आली आहे.

पालघरमधील कामाची सुरुवात हा वाढवण बंदर प्रकल्पासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. यामुळे या क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होईल आणि महाराष्ट्र व भारतासाठी व्यापार व आर्थिक विकासासोबतच रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील, अशी अपेक्षा आहे.

स्थानिक समुदाय आणि सर्व संबंधित घटकांचा विचार करून, तसेच विविध विभाग व स्थानिक घटकांमध्ये योग्य समन्वय राखून हा प्रकल्प कायदेशीर आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे

# पालघर जिल्ह्याची नाविन्यपूर्ण आणि लोककेंद्री उपक्रमांद्वारे आरोग्य सेवा बळकटीकरणाकडे वाटचाल

**पालघर :** सुलभ, दर्जेदार आणि सर्वसमावेशक आरोग्य सेवा देण्याच्या आपल्या कटिबद्धतेचा पुनरुच्चार करत, पालघर जिल्हा प्रशासनाने माता व बाल आरोग्य सेवा बळकट करणे, आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा सुधारणे आणि जिल्ह्यातील, विशेषतः आदिवासी व दुर्गम भागातील, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावणे या उद्देशाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत.

जिल्हास्तरीय गाभा समितीच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवताना, जिल्हाधिकारी डॉ. इंदू राणी जाखड यांनी जिल्ह्यातील आरोग्य निर्देशांकांचा आढावा घेतला आणि माता व बालमृत्यूचे प्रमाण आणखी कमी करण्यासाठी एक सर्वसमावेशक कृती आराखडा मांडला. प्रणालीतील त्रुटी आणि मृत्यूला कारणीभूत ठरणारे घटक शोधण्यासाठी प्रत्येक माता मृत्यूचा सखोल आढावा घेण्याचे निर्देश डॉ. जाखड यांनी दिले. उपचारांमधील विलंब दूर करणे, रेफरल (रुग्ण संदर्भ) यंत्रणा अधिक सक्षम करणे आणि टाळता येण्याजोगे मृत्यू रोखण्यासाठी वेळेवर उपाययोजना करणे यांवर विशेष भर दिला जाणार आहे.

अनेक दुर्गम गावांना भेडसावणारी भौगोलिक आव्हाने लक्षात घेऊन, प्रशासनाने माता व बाल नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) प्रणाली कार्यान्वित केली आहे. जिल्हा, तालुका आणि प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील नियंत्रण कक्ष संपूर्ण जिल्ह्यातील गर्भवती महिला आणि नवजात बालकांवर सक्रियपणे लक्ष ठेवून आहेत. उच्च-जोखीम असलेल्या (हाय-रिस्क) गरोदरपणावर लक्ष ठेवणे, वेळेवर वैद्यकीय उपचार सुनिश्चित करणे आणि आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना पुढील उपचारांसाठी पाठवणे (रेफरल) यांत या सुविधा महत्त्वाची भूमिका बजावतात.

देखरेख आणि प्रतिसाद क्षमता सुधारण्यासाठी, राष्ट्रीय आरोग्य अभियाना'तर्गत अतिरिक्त कॉल ऑपरेटर्स आणि डेटा एन्ट्री कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचे प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत. तसेच, कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी आणि आरोग्य संस्थांमधील समन्वय सुधारण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती तयार केल्या जात आहेत.

आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी, जिल्हा प्रशासनाने वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्येच उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून वैद्यकीय सेवांची त्वरित उपलब्धता आणि गुंतागुंतीच्या प्रकरणांमध्ये रुग्णांना त्वरित पुढील उपचारांसाठी पाठवणे (रेफरल) सुनिश्चित करता येईल. या उपाययोजनेचा उद्देश सरकारी आरोग्य सुविधांवरील लोकांचा विश्वास वाढवणे आणि रुग्णांना वेळेवर उपचार मिळवून देणे हा आहे.

आपत्कालीन वाहतूक सेवांकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. जव्हार, मोखाडा आणि तलासरी यांसारख्या दुर्गम आदिवासी तालुक्यांमध्ये रुग्णवाहिकांची उपलब्धता सुधारणे आणि त्यासाठी स्वतंत्र चालकांची नेमणूक करणे यांसारख्या योजनांवर काम सुरू आहे. तसेच, उत्तरदायित्व, कार्यक्षमता आणि जलद प्रतिसाद सुनिश्चित करण्यासाठी १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचे रिअल-टाइम जीपीएस-आधारित निरीक्षण करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. रुग्णवाहिकांच्या हालचाली आणि सेवा वितरणाचा मागोवा घेण्यासाठी जिल्हा स्तरावर देखरेख प्रणाली स्थापित केली जाईल. याव्यतिरिक्त, मे २०२६ मध्ये पालघर जिल्ह्यात या योजनेअंतर्गत अनेक नवीन रुग्णालयांचा समावेश करण्यात आला, ज्यामुळे नागरिकांसाठी दर्जेदार आरोग्यसेवेची उपलब्धता आणखी वाढली आहे.

कुपोषणाचा सामना करण्यासाठी लोकसहभागातून राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांतर्गत, मोखाडा, जव्हार, विक्रमगड आणि वाडा यांसारख्या संवेदनशील भागांमधील तीव्र कुपोषण आणि मध्यम तीव्र कुपोषण असलेल्या मुलांसाठी पौष्टिक पूरक आहार तयार करण्यास महिला बचत गटांना प्रोत्साहित केले जाईल. या उपक्रमाचा उद्देश पोषणविषयक स्थिती सुधारणे आणि त्याच वेळी ग्रामीण महिलांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण करणे हा आहे.

प्रशासन संपूर्ण जिल्ह्यात निदान आणि आरोग्यसेवा पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठीही पावले उचलत आहे. प्रगत 'टीबी नॅट' निदान यंत्रे आणि डिजिटल क्ष-किरण सुविधांसाठी प्रस्ताव तयार केले जात आहेत. त्याचबरोबर, आरोग्य संस्थांमधील पायाभूत सुविधांची कमतरता दूर करण्यासाठी आणि 'राष्ट्रीय गुणवत्ता हमी मानके' प्रमाणपत्र मिळवण्यासाठी त्यांना मदत दिली जाईल. महाराष्ट्र दिन आणि स्वातंत्र्यदिन यांसारख्या राष्ट्रीय प्रसंगी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संस्था, आरोग्य कर्मचारी आणि NQAS मार्गदर्शक यांचा गौरव केला जाईल.

आरोग्यसेवेची उपलब्धता वाढवण्यासाठी आणि सरकारी कल्याणकारी योजनांमधील सहभाग सुधारण्यासाठी, महसूल विभागाच्या शिबिरांच्या समन्वयाने 'आयुष्मान भारत' नोंदणी शिबिरे आयोजित केली जातील. यामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी अनेक सेवांचा लाभ घेता येईल. तसेच, 'आयुष्मान भारत हेल्थ कार्ड' योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांची १०० टक्के नोंदणी सुनिश्चित करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल.

जिल्हा प्रशासनाने ० ते ४० वयोगटातील व्यक्तींमध्ये सिकल सेल आजाराच्या तपासणीसाठी सखोल मोहीम आखली आहे. निमिया-मुक्त मोहीम अंतर्गत तीव्र निमिया (रक्तक्षय) असलेल्या रुग्णांसाठी विशेष उपाययोजना राबवल्या जातील. विद्यार्थ्यांमधील आरोग्यविषयक समस्यांची सुरुवातीच्या टप्प्यावरच ओळख पटवून त्यावर उपाययोजना करण्यासाठी आश्रमशाळांमध्ये विशेष आरोग्य तपासणी शिबिरेही आयोजित केली जातील.

याव्यतिरिक्त, वैद्यकीय अधीक्षक आणि तालुका आरोग्य अधिकारी यांना परिचारिका वर्गासाठी अभिमुखता बैठका घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बैठकांमध्ये रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधताना संवेदनशील, सहानुभूतीपूर्ण आणि रुग्ण-केंद्रित दृष्टिकोन ठेवण्याच्या गरजेवर भर दिला जाईल.

हे सर्व उपक्रम पालघर जिल्हा प्रशासनाची एक मजबूत आरोग्य व्यवस्था उभारण्याची कटिबद्धता दर्शवतात; अशी व्यवस्था जी समाजातील सर्व घटकांसाठी, विशेषतः आदिवासी आणि वंचित समुदायांसाठी प्रतिसादक्षम, न्याय्य आणि सहज उपलब्ध असेल.

## स्वाधार शिष्यवृत्ती योजनेसाठी आता शासकीय वसतिगृहाचा अर्ज बंधनकारक

**पालघर** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय नियमांत महत्वाचा बदल करण्यात आला आहे. चालु शैक्षणिक वर्षापासुन या योजनेचा लाभमिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृह प्रवेश मिळणार नाही, त्यांनाच स्वाधार योजनेसाठी पात्र ठरवले जाईल. मात्र जे विद्यार्थी वसतिगृहासाठी अर्जच करणार नाहीत, ते दोन्ही योजनांपासुन वंचित राहतील ज्या तालुक्यात वसतिगृह नाहीत, तेथे हा नियम शिथिल असला तरी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मागील परीक्षेत ५०% पेक्षा अधिक गुण मिळालेले पात्र अर्जाची अंतिम मुदत शालेय अभ्यासक्रम : ३० जुन पर्यत, ११ वी, १२ वी आणि बिगर व्यावयासिक अभ्यासक्रम : १५ जुलै २०२६ पर्यंत या मुदतीत संबंधित विद्यार्थ्यांचे प्रस्ताव ऑनलाईन सादर होणे आवश्यक आहे. विद्यार्थी hmasnew.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करु शकतात.

## बुलेट ट्रेनने मुंबई-पुणे ४८ मिनिटांत; महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे केंद्र बनवणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ **जबिलच्या रांजणगाव येथील अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाचे उद्घाटन; इलेक्ट्रॉनिक्स, डेटा सेंटर आणि सेमीकंडक्टर क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर**

पुणे : मुंबई-पुणे बुलेट ट्रेनमुळे दोन्ही शहरांतील प्रवास अवघ्या ४८ मिनिटांत होणार असून मुंबई आणि पुणे हे एकात्मिक आर्थिक क्षेत्र म्हणून विकसित होतील. तसेच जेएनपीटी आणि वाढवण बंदरांना समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडून महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचे महत्त्वाचे केंद्र बनविण्याचा राज्य शासनाचा संकल्प असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

रांजणगाव औद्योगिक वसाहतीतील जबिल कंपनीच्या अत्याधुनिक उत्पादन विस्तार प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रेल्वे, माहिती व प्रसारण तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव, आमदार दिलीप वळसे पाटील, ज्ञानेश्वर कटके, राज्याचे उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनबलगन, जॅबिलचे कार्यकारी उपाध्यक्ष (ऑपरेशन्स) अँडी प्रिस्टली, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. एन. शुक्ला, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी तसेच एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र देशातील डेटा सेंटर हब म्हणून उदयास येत असून भारतातील सुमारे ६० टक्के डेटा सेंटर क्षमता राज्यात विकसित होत आहे. त्यामुळे डेटा सेंटर, डीप टेक, इलेक्ट्रॉनिक्स आणि चिप उत्पादनाशी संबंधित संपूर्ण उद्योग परिसंस्था महाराष्ट्रात निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे त्यांनी सांगितले. इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीमध्ये महाराष्ट्राने अग्रस्थान मिळविल्याचे नमूद करत मुख्यमंत्री म्हणाले की, केंद्र सरकारने राज्याला दिलेल्या इलेक्ट्रॉनिक्स क्लस्टरमुळे उद्योग क्षेत्राला नवी गती मिळणार आहे. यावेळी त्यांनी जेएनपीटी आणि उभारणीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या वाढवण बंदराला समृद्धी महामार्गालगत स्वतंत्र मालवाहतूक रेल्वे कॉरिडॉरद्वारे जोडण्याचा महत्वाकांक्षी प्रस्ताव केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासमोर मांडल्याची माहिती दिली. हा कॉरिडॉर जालना, वर्धा येथील ड्राय पोर्ट आणि पुढे गडचिरोलीपर्यंत जोडला जाणार असून त्यामुळे लॉजिस्टिक्सचा खर्च ७ ते ८ टक्क्यांपर्यंत कमी होईल. यामुळे महाराष्ट्र जागतिक पुरवठा साखळीतील प्रभावी केंद्र म्हणून उदयास येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभागातर्फे २२ जूनपासून राज्यभर 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा'चे आयोजन- शेखर मुंदडा

■ **पशुसंवर्धन आयुक्तालय येथून होणार शुभारंभ**

**पुणे :** महाराष्ट्रातील देशी गोवंशाचे रक्षण, संवर्धन आणि गोशाळांना आत्मनिर्भर बनवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र गोसेवा आयोग व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर 'राज्यमाता गोमाता संवाद यात्रा' आयोजन करण्यात आली आहे. ही यात्रा २२ जून ते ५ जुलै २०२६ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात मार्गक्रमण करणार असून यात्रेचा शुभारंभ २२ जून रोजी सायंकाळी ४:३० वाजता पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष व यात्रा आयोजन समितीचे प्रमुख शेखर मुंदडा यांनी दिली. श्री. मुंदडा म्हणाले, संवाद यात्रा सलग १५ दिवस सुरू राहणार असून या दरम्यान सुमारे ६ हजार किलोमीटरचा प्रवास केला जाणार आहे. महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांमध्ये या यात्रेचे संचालन होणार असून, यामध्ये राज्यातील १ हजाराहून अधिक गोशाळा प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. या संपूर्ण प्रवासात १५ हजारापेक्षा जास्त गोशाळा संचालक, गोरक्षक, गोपालक आणि शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून विविध विषयांवर चर्चा केली जाईल.

## शाळेच्या पहिल्याच दिवशी पालघर प्रशासनाकडून भूमीहक्क जनजागृतीसाठी अनोख्या कॉमिक पुस्तकाचा शुभारंभ

**पालघर :** पालघर जिल्ह्यात नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाने शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण असताना, शाळेच्या पहिल्याच दिवशी आदिवासी समाजामध्ये भूमीहक्कांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी एका अभिनव उपक्रमालाही सुरुवात करण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या या अनोख्या उपक्रमात विद्यार्थी आपल्या कुटुंबांपर्यंत जमीन मालकी आणि कायदेशीर हक्कांबाबतची महत्त्वपूर्ण माहिती पोहोचविणारे परिवर्तनाचे दूत बनणार आहेत. या उपक्रमाचा केंद्रबिंदू असलेले आपली जमीन, आपले हक्क हे विशेष कॉमिक पुस्तक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणूचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी विशाल खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आले आहे.

पिढ्यानपिढ्या अनेक आदिवासी कुटुंबांना कालबाह्य जमीन अभिलेख, वारसाहक्काशी संबंधित प्रलंबित बाबी आणि कायदेशीर कागदपत्रांविषयीच्या मर्यादित माहितीसारख्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे शासकीय योजनांचा लाभ घेणे, वनहक्क प्राप्त करणे तसेच विविध विकास प्रकल्पांमधील लाभ मिळविणे कठीण होते. या आव्हानांवर मात करण्यासाठी शाळांना कायदेशीर साक्षरता आणि समुदाय सक्षमीकरणाची केंद्रे बनविण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे.

सोप्या चित्रांद्वारे आणि सहज समजणाऱ्या कथांद्वारे हे कॉमिक पुस्तक विद्यार्थ्यांना जमीन अभिलेख, वारसाहक्क, वनहक्क दावे तसेच महसुली कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे महत्त्व याविषयी माहिती देते. विद्यार्थ्यांना शिक्षित करण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबांमध्ये कायदेशीर हक्क आणि जबाबदाऱ्यांविषयी अर्थपूर्ण संवाद घडवून आणणे हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे ५,००० कॉमिक पुस्तकांच्या प्रती छापण्यात येणार असून त्या टप्प्याटप्प्याने जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळा आणि आश्रमशाळांमध्ये वितरित करण्यात येतील. यामुळे हजारो आदिवासी कुटुंबांपर्यंत या उपक्रमाचा लाभ पोहोचणार आहे.

उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी एक संरचित प्रशिक्षण व्यवस्था तयार करण्यात आली आहे. तलाठी, मंडळ अधिकारी आणि नायब तहसीलदार यांसह महसूल अधिकारी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या सहकार्याने निवडक शिक्षकांना 'मास्टर ट्रेनर' म्हणून प्रशिक्षित करतील. हे प्रशिक्षित शिक्षक पुढे विद्यार्थ्यांना आणि इतर शिक्षकांना जमीन अभिलेख समजून घेण्यास व पडताळणी प्रक्रियेत मार्गदर्शन करतील.

ऑगस्ट महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या वार्षिक महसूल सप्ताहादरम्यान या उपक्रमाला अधिक गती मिळणार आहे. शाळांमध्ये विशेष कार्यशाळा आणि पडताळणी शिबिरे आयोजित केली जातील. विद्यार्थ्यांना त्यांच्या कुटुंबांचे ७/१२ उतारे, वनहक्काशी संबंधित कागदपत्रे आणि इतर आवश्यक दस्तऐवज शाळेत आणण्यास प्रोत्साहित केले जाईल. यामुळे महसूल अधिकाऱ्यांना कागदपत्रांची पडताळणी आणि अद्ययावतीकरणाची प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

'गतीमान प्रशासन' अंतर्गत समर्थित हा उपक्रम उपलब्ध शैक्षणिक आणि प्रशासकीय संसाधनांचा प्रभावी वापर करण्यावर भर देतो. कायदेशीर जागरूकतेची सांगड शालेय व्यवस्थेशी घालून भूमीहक्क सुरक्षित करणे आणि शासकीय लाभांपर्यंत पोहोच वाढविण्यासाठी दीर्घकालीन, लोककेंद्रित यंत्रणा उभारण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना ज्ञानाद्वारे सक्षम केल्यास त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण समाजावर होऊ शकतो. जेव्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव होते, तेव्हा ते आपल्या कुटुंबांमध्ये आणि गावांमध्ये जनजागृतीचे प्रभावी माध्यम बनतात.